# रयत शिक्षण संस्था,सातारा

**कर्मवीर समाधी परिसर,सातारा**

**आस्थापना माध्यमिक, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग व वरिष्ठ महाविद्यालये**

परिपत्रक क्र. ७

दि. १९/०४/२०२२

सर्व शाखाप्रमुख,
प्राथमिक, माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये,
व्यवसाय अभ्यासक्रम (HSVC), तांत्रिक विद्यालये, आश्रमशाळा व वरिष्ठ महाविद्यालये
रयत शिक्षण संस्था.

विषय :- सन २०२२-२३ मध्ये सेवकांनी करावयाच्या बदली अर्जाबाबत. .
संदर्भ :- १. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या दि. ९/१०/२०२१ रोजीच्या बैठकीतील ठराव नं. १६
२. आमचेकडील परिपत्रक क्र. जन/१८ दि. २६/१०/२०२१ नुसार

प्राथमिक, माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग (HSVC), तांत्रिक विद्यालये, आश्रमशाळा व वरिष्ठ महाविद्यालयाकडे कार्यरत असणाऱ्या सेवकांनी वरील संदर्भीय ठरावामध्ये व परिपत्रकात दिलेले निकष व मार्गदर्शक तत्वानुसार (सोबत मॅनेजिंग कौन्सिलच्या दि. ०९/१०/२०२१ रोजीच्या बैठकीतील ठराव नं. १६ ची प्रत) आपले बदली अर्ज ऑनलाईन पध्दतीने मध्यवर्ती कार्यालयाकडे https://transfer.rayaterp.in या संकेत स्थळावर पुढील सूचनांच्या आधारे दि. २७/०४/२०२२ पूर्वी सादर करावेत.

१. बदली निकषानुसार बदलीसाठी पात्र असणाऱ्या सेवकांना SMS तसेच शाखेच्या ई-मेलद्वारे कळविले आहे. तसेच बदली पात्र सेवकांची यादी संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
२. विषय व शाखनिहाय रिक्त पदांची माहिती संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
३. सेवकांनी बदली अर्जात त्यांना अपेक्षित असणाऱ्या तीन बदली शाखा नमूद करणे बंधनकारक आहे. जे पात्र सेवक विकल्पासह ऑनलाईन अर्ज भरणार नाहीत अशा सेवकांची बदली, बदली-निकषानुसार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
४. सेवकांनी विहित नमुन्यातच उपरोक्त संकेत स्थळावर ऑनलाईन केलेल्या बदली अर्जाचा विचार केला जाईल. याशिवाय इतर कोणत्याही मार्गाने आलेल्या अर्जाचा व अपूर्ण / चूकीची माहिती असणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
५. संस्थेत काम करीत असणाऱ्या दाम्पत्याने त्यांच्या एकत्रीकरणासाठी बदली अर्ज करताना पत्नीच्या नावात बदल असल्यास शाखाप्रमुखांच्या अभिप्रायासह नवीन नाव सुध्दा नमूद करावे. तसेच बदली अर्ज करीत असताना पतीचा किंवा पत्नीचा HRMS कोड नमूद करणे गरजेचे आहे.
६. अर्ज करण्याची शेवटची तारीख २७/०४/२०२२ असून या ताखेनंतर आलेल्या बदली अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोद घ्यावी.
७. शाखाप्रमुखांनी सदरचे परिपत्रक व संस्थेकडील दि. ०९/१०/२०२१ चा सोबत दिलेला मॅनेजिंग कौन्सिलचा ठराव आपल्या शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून तो वाचल्याबद्दल त्यांच्या सहया घेऊन त्याची प्रत शाखा दप्तरी ठेवावी.

पान नं. २ वर. .

८. ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) सेवकांनी बदली प्रक्रियेसाठी https://transfer.rayaterp.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा.

ब) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी सेवकांनी उपरोक्त वेबसाईटवर ठेवलेल्या मार्गदर्शक Video चे काळजीपूर्वक अवलोकन करावे.

क) सेवकांनी बदली अर्ज करणेसाठी मोबाईलवर किंवा ई-मेलवर आलेल्या Username & Password वापरुन लॉगीन करावे. ( ज्या सेवकांना Username & Password मोबाईलवर किंवा ई-मेलवर प्राप्त झाला नाही, त्यांनी संबंधित शाखेत संपर्क साधावा.)

ड) सेवकांनी उपरोक्त संकेत स्थळावर लॉगीन केल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

Login ⇨ Apply for Transfer ⇨ Add Preferences ⇨ Submit ⇨ Verify OTP ⇨ Verify & submit Print Application ⇨ Submit respective Branch

इ) उपरोक्त अर्ज ऑनलाईन Submit केल्यानंतर त्यामध्ये परत बदल करता येणार नाही.

ई) सदरचे परिपत्रक संस्थेच्या वेबसाईटवर माहितीसाठी उपलब्ध आहे.

**उ) प्राथमिक व माध्यमिक शाखेतील सर्व सेवकांनी ऑनलाईन भरलेला अर्ज तपासून तात्काळ प्रिंट काढावी अन्यत: प्रिंट काढता येणार नाही. तसेच प्रिंट काढलेल्या बदली अर्जावर सेवकाने स्वत:ची सही करुन शाखाप्रमुखांच्या शिफारशीने संबंधीत विभागीय कार्यालयाकडे पाठवावेत.**

**ऊ) वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग (HSVC), तांत्रिक विद्यालये, आश्रमशाळा शाखेतील सर्व सेवकांनी ऑनलाईन भरलेला अर्ज तपासून तात्काळ प्रिंट काढावी. तसेच प्रिंट काढलेल्या बदली अर्जावर सेवकाने स्वत:ची सही करुन शाखाप्रमुखांच्या शिफारशीने मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवावेत.**

तसेच शाखाप्रमुखांनी आपल्या शाखेत बदली निकषानुसार बदलीस पात्र ठरलेल्या सेवकांच्या आलेल्या ई-मेलनुसार संबंधीत सेवकांचे विकल्प घेऊन सदरचे अर्ज दिलेल्या मुदतीत ई-मेलद्वारे संस्था कार्यालयाकडे पाठवावेत. याबाबत कोणत्याही सेवकाचा बदली विकल्पासह अर्ज भरावयाचा राहू नये याची दक्षता घ्यावी.

(रयत शिक्षण संस्था सातारा – stamp)

for सचिव
रयत शिक्षण संस्था,सातारा.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा.
२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा.
३. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
४. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था.